राज्य शासकीय अधिकाऱ्यांना सातव्या वेतन आयोगाप्रमाणे तीन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना अनुज्ञेय करणेबाबत...
महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, सहायक संचालक गट-अ (कनिष्ठ) संवर्ग

**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**संचालनालय लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य, मुंबई**
क्र.संलेको/प्रशा-राप/का-४/न.क्र.२०२३-८५/३०८
तळ मजला, कस्तुरी इमारत, पेट्रोलियम हाऊस समोर, जमशेदजी टाटा मार्ग,
चर्चगेट, मुंबई-४०००२०.
दिनांक:- २८ फेब्रुवारी २०२४

वाचा: (१) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एसआरव्ही-१०९५/प्र.क्र.१/९५/बारा दि.०८/०६/१९९५
(२) वित्त विभाग, शासन निर्णय क्र. ११९९/प्र.क्र.२/९९/सेवा-३ दि.२०/०७/२००१
(३) वित्त विभाग, शासन निर्णय क्र. वेतन-२००२/प्र.क्र.१/सेवा-३ दि.११/०१/२००२
(४) वित्त विभाग, शासन निर्णय क्र. वेतन ११०९/ प्र.क्र.४३/सेवा-३ दि.३१/०८/२००९
(५) वित्त विभाग, शासन निर्णय क्र. वेतन ११०९/ प्र.क्र.४४/९९/सेवा-३ दि.०१/०४/२०१०
(६) वित्त विभाग, शासन निर्णय क्र. वेतन ११०९/ प्र.क्र.८/सेवा-३ दि.०१/०७/२०११
(७) वित्त विभाग, शासन निर्णय क्र. आप्रयो-१०१२/ प्र.क्र.७१/सेवा-३ दि.१९/०१/२०१३
(८) वित्त विभाग, शासन शुद्धिपत्रक क्र. वेतन-१११९/प्र.क्र.८/सेवा-३ दि.०९/१२/२०१६
(९) वित्त विभाग, शासन शुद्धिपत्रक क्र. आप्रयो-१०१५/ प्र.क्र.१११/ २०१५/ सेवा-३ दि.२३/१२/२०१५
(१०) वित्त विभाग, शासन शुद्धिपत्रक क्र. वेतन-१११९/प्र.क्र.०८/सेवा-३ दि.११/०५/२०१७
(११) वित्त विभाग, शासन निर्णय क्र. वेतन-१११९/ प्र.क्र.३/ २०१९/ सेवा-३ दि.०२/०३/२०१९
(१२) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एसआरव्ही-२०१८/ प्र.क्र.१५९/ कार्यासन -१२ दि.०१/०८/२०१९
(१३) वित्त विभाग, शासन पत्र क्र. वेतन-२०१९/प्र.क्र.१२५/सेवा-३ दि.१०/१२/२०१९
(१४) वित्त विभाग, शासन पत्र क्र. वेतन-१११९/ प्र.क्र.३/ सेवा-३ दि.०२/११/२०२०
(१५) संचालनालयाचे आदेश क्र. संलेको/का-१/प्रशा-राप/२४ दि.११/०१/२०२१

**-:आदेश:-**

वित्त विभाग, शासन निर्णय क्र. वेतन-१११९/ प्र.क्र.३/ २०१९/ सेवा-३ दि.०२/०३/२०१९ अन्वये सातव्या वेतन आयोगाच्या कार्यकाळामध्ये, १०, २० व ३० वर्षांच्या नियमित सेवेनंतरची, तीन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना ही दि.०१/०१/२०१६ पासून अंमलात आली आहे.

२. महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील सहायक संचालक आणि उपसंचालक संवर्गाचे वेतनस्तर पुढीलप्रमाणे आहेत:

| अ.क्र | संवर्ग | सहाव्या वेतन आयोगाची वेतनश्रेणी | सातव्या वेतन आयोगाचे वेतनस्तर |
|---|---|---|---|
| १ | सहायक संचालक | ₹ १५६००-₹ ३९१०० ग्रेड वेतन ₹ ५४०० | S-२०: ₹ ५६१००-₹ १७७५०० |
| २ | उपसंचालक | ₹ १५६००-₹ ३९१०० ग्रेड वेतन ₹ ६६०० | S-२३: ₹ ६७७००-₹ २०८७०० |

३. उक्त उल्लेखित शासन निर्णयानुसार सातव्या वेतन आयोगामध्ये तीन लाभांची सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजना ही वेतन मॅट्रीक्समधील वेतनस्तर S-२० पर्यंत वेतन घेणाऱ्या (सहाव्या वेतन आयोगातील पे बँड ₹ १५६००-₹ ३९१०० व ग्रेड पे ₹ ५४००/- वेतन संरचनेशी समकक्ष) कर्मचारी/ अधिकारी यांना लागू राहील; मात्र सबंधित कर्मचारी/अधिकारी हे कोणत्याही कारणामुळे वेतनस्तर S-२१ मध्ये वेतन आहरीत करू लागतील, तेव्हा त्यांना उपरोक्त नवीन योजनेंतर्गत लाभ अनुज्ञेय राहणार नाही अशी तरतूद करण्यात आली होती.

तथापि वित्त विभाग, शासन पत्र क्र. वेतन-१११९/ प्र.क्र.३/ सेवा-३ दि.०२/११/२०२० अन्वये सहायक संचालक पदावरील अधिकाऱ्यास विद्यमान S-२० या वेतनस्तरानंतर पदोन्नतीच्या साखळीत (In Promotion Hierarchy) S-२३ या वेतनस्तरामध्ये उपसंचालक हे पद असल्याने, विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीत पात्रता आजमावल्यानंतर, पात्र ठरत असल्यास, सबंधीतांस वेतनस्तर S-२३ मध्ये अनुज्ञेय लाभ मंजूर करता येईल अशी मान्यता प्राप्त झाली आहे.

४. महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा सहायक संचालक संवर्गाच्या दि.०१/०१/२०२१ रोजीच्या अंतिम ज्येष्ठतासूचीनुसार सहायक संचालक संवर्गात १० वर्षे नियमित सेवा झालेल्या पुढील तक्त्यातील नमूद २१ पात्र अधिकाऱ्यांना तीन लाभांच्या सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेनुसार उपसंचालक संवर्गाच्या वरिष्ठ वेतनश्रेणीचा लाभ हा शासकीय सेवेतील पहिला लाभ म्हणून त्यांच्या नावासमोर स्तंभ-६ मध्ये नमूद केलेल्या दिनांकापासून अनुज्ञेय करण्यात येत आहे.

| अ.क्र. | ज्येष्ठ तासूची तील क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील सहायक संचालक गट-अ (कनिष्ठ) संवर्गातील प्रवेशाचा दिनांक | महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील सहायक संचालक गट-अ (कनिष्ठ) संवर्गातील पदावर १० वर्षे पूर्ण झाल्याचा दिनांक | तीन लाभांच्या सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ ज्या दिनांकापासून अनुज्ञेय होण्याचा दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| [१] | [२] | [३] | [४] | [५] | [६] |
| १ | १७७ | श्री.राजेंद्र मुरलीधर खैरनार | ०१-०१-२०१४ | ०१-०१-२०२४ | ०१-०१-२०२४ |
| २ | १७८ | श्री.विकास जगन्नाथ कुंभार | ०१-०१-२०१४ | ०१-०१-२०२४ | ०१-०१-२०२४ |
| ३ | १७९ | श्री.राधाकिसन शेषराव राऊत | ०१-०१-२०१४ | ०१-०१-२०२४ | ०१-०१-२०२४ |
| ४ | १८० | श्री.राजेश्वर देवराव माने | ०१-०१-२०१४ | ०१-०१-२०२४ | ०१-०१-२०२४ |
| ५ | १८१ | श्री.योगेश बारकू क्षीरसागर | ०१-०१-२०१४ | ०१-०१-२०२४ | ०१-०१-२०२४ |
| ६ | १८२ | श्री.सुहास जयवंत विसपुते | ०१-०१-२०१४ | ०१-०१-२०२४ | ०१-०१-२०२४ |
| ७ | १८३ | श्री.विजय केशवराव देशमुख | ०१-०१-२०१४ | ०१-०१-२०२४ | ०१-०१-२०२४ |
| ८ | १८४ | श्री.शिवप्रसाद वसंत खोत | ०१-०१-२०१४ | ०१-०१-२०२४ | ०१-०१-२०२४ |
| ९ | १८६ | श्री.प्रकाश केशवराव दासे | ०१-०१-२०१४ | ०१-०१-२०२४ | ०१-०१-२०२४ |
| १० | १८७ | श्री.सोमिनाथ बबन काकडे | ०१-०१-२०१४ | ०१-०१-२०२४ | ०१-०१-२०२४ |
| ११ | १८८ | श्री.सुजित मधुकर देवकर | ०१-०१-२०१४ | ०१-०१-२०२४ | ०१-०१-२०२४ |
| १२ | १८९ | श्री.राजू तुकाराम लाकुडझोडे | ०१-०१-२०१४ | ०१-०१-२०२४ | ०१-०१-२०२४ |
| १३ | १९१ | श्री.सचिन नारायणराव चाटे | ०१-०१-२०१४ | ०१-०१-२०२४ | ०१-०१-२०२४ |
| १४ | १९३ | श्री.विजयकुमार बाबुराव कलवले | ३१-०१-२०१४ | ३१-०१-२०२४ | ३१-०१-२०२४ |
| १५ | १९४ | श्री.उमेश सिताराम गायकवाड | ०१-०१-२०१४ | ०१-०१-२०२४ | ०१-०१-२०२४ |
| १६ | १९५ | श्री.योगेश महादेव जाधव | ०१-०१-२०१४ | ०१-०१-२०२४ | ०१-०१-२०२४ |
| १७ | १९६ | श्री.अमित केवलराम मेश्राम | ०१-०१-२०१४ | ०१-०१-२०२४ | ०१-०१-२०२४ |
| १८ | १९७ | श्री.विजय अभिमान जवंजाळ | ०१-०१-२०१४ | ०१-०१-२०२४ | ०१-०१-२०२४ |
| १९ | १९८ | श्रीम.भाग्यश्री शंकरराव जाधव | ०१-०१-२०१४ | ०१-०१-२०२४ | ०१-०१-२०२४ |

५. <u>अटी व शर्ती:</u>

**(i) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. एसआरव्ही-१०९५/प्र.क्र.१/९५/बारा दि.०८/०६/१९९५ मधील अट क्र.२ (मा):** सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेंतर्गत अनुज्ञेय करण्यात आलेल्या लाभामुळे सबंधित अधिकाऱ्यांच्या जबाबदारी व कर्तव्ये यात वाढ होत नसली तरी नियमित पदोन्नतीप्रमाणे पदोन्नतीच्या पदाच्या वेतन संरचनेत वेतन निश्चितीचा लाभ मिळेल. मात्र वेतननिश्चितीत मिळालेला हा लाभ त्याच वेतनश्रेणीत कार्यात्मक (Functional) पदोन्नती मिळाल्यावर पुन्हा देय होणार नाही.

**(ii) वित्त विभाग, शासन निर्णय क्र. वेतन-१११९/ प्र.क्र.३/ २०१९/ सेवा-३ दि.०२/०३/२०१९ मधील योजनेचा तपशील अ.क्र. (XX)(२):** कार्यात्मक पदोन्नती नाकारली आहे अशा अथवा कार्यात्मक पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या कर्मचारी/अधिकारी यांस भविष्यात होणाऱ्या/झालेल्या विभागीय पदोन्नती समितीच्या बैठकीत, कार्यात्मक पदोन्नतीस पात्र ठरल्यास त्यास कार्यात्मक पदोन्नतीचा कार्यभार स्वीकारल्याच्या दिनांकापासून १० वर्षांच्या नियमित सेवेनंतर, अन्य विहित अटी व शर्तींच्या पूर्ततेनंतर, या योजनेंतर्गत यथास्थिति पहिला/दुसरा/तिसरा लाभ पात्रतेनुसार मंजूर करण्यात येईल.

**(iii) वित्त विभाग, शासन निर्णय क्र. वेतन-१११९/ प्र.क्र.३/ २०१९/ सेवा-३ दि.०२/०३/२०१९ मधील योजनेचा तपशील अ.क्र. (XX)(३):** सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेखाली पहिला, दुसरा व तिसरा अथवा तिन्ही लाभ मंजूर केल्यानंतर प्रत्यक्ष पदोन्नती नाकारलेल्या अथवा पदोन्नतीस अपात्र ठरलेल्या कर्मचाऱ्यांना देण्यात आलेले लाभ काढून घेण्यात येतील, तथापि अशा लाभांची वसुली करण्यात येणार नाही. तसेच असे लाभ काढून घेतल्यानंतर संबंधितांची वेतननिश्चिती ही जणू काही या योजनेचे लाभ देण्यात आले नव्हते असे समजून, महाराष्ट्र नागरी सेवा (वेतन) नियम, १९८१ मधील नियम १२ च्या तरतुदीनुसार करण्यात येईल.

**(iv)** या आदेशान्वये तीन लाभांच्या सुधारीत सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेचा लाभ देण्यात आलेल्या अधिकाऱ्यांना वित्त विभाग, शासन निर्णय क्र. पीएवाय १०८२/ सीआर-११०० (एक)/ एसईआर-३ दि.०६/११/१९८४ आणि वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. वेपुर-२०१९/ प्र.क्र.८/ सेवा-९ दि.२०/०२/२०१९ अनुसार वेतन निश्चितीचा विकल्प द्यावयाचा झाल्यास तो त्यांनी सदर आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत द्यावा.

६. सबंधित कार्यालय प्रमुखांनी उक्त अधिकाऱ्यांची पदोन्नतीच्या पदाच्या वेतन संरचानेतील वेतन निश्चिती त्यांनी दिलेल्या विकल्पानुसार करून त्यांना या योजनेचा लाभ त्यांच्या नावासमोर स्तंभ क्र.६ मध्ये दर्शविलेल्या दिनांकापासून S-२३ या वेतनस्तरामध्ये देण्यात यावा.

७. सदर आदेश संचालनालयाच्या https://www.mahakosh.maharashtra.gov.in/ या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आले असल्यामुळे सबंधित अधिकाऱ्यांच्या वेतननिश्चितीसाठी कार्यालय प्रमुखांनी संकेतस्थळावरील प्रत ग्राह्य धरावी.

(दीपा देशपांडे)
संचालक
लेखा व कोषागारे, महाराष्ट्र राज्य
मुंबई

प्रत,

१. संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई,
२. सहसचिव (कोषा.प्रशा.२), वित्त विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई,
३. सर्व सहसंचालक लेखा व कोषागारे

४. सर्व सहसंचालक स्थानिक निधी लेखा परीक्षा
५. सबंधित अधिकाऱ्यांचे कार्यालयप्रमुख
६. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
७. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
८. सहायक संचालक, गोपनीय अहवाल कक्ष, मुख्यालय
९. सबंधित अधिकारी
१०. श्री.सुनील छत्रपती मोरे, सहायक संचालक लेखा (प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण), राज्य व्यवस्थापन कक्ष ग्रामीण गृहनिर्माण, चौथा मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन, सी. बी. डी. बेलापुर, नवी मुंबई-४००६१४.

    आपले सन २०१८-२०१९ व सन २०२२-२०२३ या कालावधीतील गोपनीय अहवाल अप्राप्त असल्याने आपले प्रकरण राखून ठेवण्याचा निर्णय विभागीय पदोन्नती समितीने घेतला आहे. अप्राप्त गोपनीय अहवाल प्राप्त झाल्यावर आपले प्रकरण समितीसमोर पुनश्चः सादर करण्यात येईल; सबब आपण प्रस्तुत कालावधीचे गोपनीय अहवाल तात्काळ संचालनालयास उपलब्ध करून द्यावेत.
११. श्री.अमित केदार अहिरे, लेखापाल, नगरपरिषद अंबरनाथ, ठाणे-४२१५०१.

    आपले सन २०१८-२०१९ ते सन २०२२-२०२३ या कालावधीतील गोपनीय अहवाल अप्राप्त असल्याने आपले प्रकरण राखून ठेवण्याचा निर्णय विभागीय पदोन्नती समितीने घेतला आहे. अप्राप्त गोपनीय अहवाल प्राप्त झाल्यावर आपले प्रकरण समितीसमोर पुनश्चः सादर करण्यात येईल; सबब आपण प्रस्तुत कालावधीचे गोपनीय अहवाल तात्काळ संचालनालयास उपलब्ध करून द्यावेत.
१२. सबंधित अधिकाऱ्यांची वैयक्तिक नस्ती
१३. निवड नस्ती